# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ४३

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**रूपये:- ४,७४,७८,४६,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | ५७६ | १० | शासकीय विश्रामगृह कुही,शासकीय विश्रामगृह उमरेड, शासकीय विश्रामगृह भिवापूर जिल्हा नागपूर येथील विश्राम गृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सदर ठिकाण यावरील दुरुस्ती किंवा नूतनीकरण न केल्यामुळे लोकप्रतनिधीं तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी किंवा अभ्यांगत यांना प्रचंड गैरसोईचा सामना करावा लागतो त्यामुळे शासनाने तातडीने उपरोक्त ठिकाणी सर्व शासकीय विश्राम गृह नूतनीकरणासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५१, बंदरे व दीपगृहे**<br>**रूपये:- ३,८२,३३,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२) | ३४८ | १० | मुंबई उपनगर जिल्ह्यातील मढ ते मार्वे गाव तसेच मनोरी गाव, मालाड (पश्चिम) येथे मासेमारीसाठी अनेक बंदरे असणे, मासेमारी बोटींना दिशा देण्यासाठी दीपगृह असणे, तसेच जलमार्गाने मार्वे ते मनोरी गाव आणि मार्वे ते एस्सेलवर्ल्ड या दोन्ही रो-रो सेवा सुरु असणे, तसेच रो-रो जेट्टीपर्यंत जाण्यासाठी सुसज्ज रस्ता नसणे, अनेक जेट्टीचे काम अपुर्णावस्थेत असणे, दीपगृह व्यवस्थित काम करत नसणे, त्यामुळे दीपगृहाची दुरुस्ती आणि बांधकाम करण्याची आवश्यकता असणे, याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असणे, मच्छीमार व सर्वसामान्य जनतेमध्ये शासना विरोधात पसरलेली नाराजी व असंतोषाची भावना, यावर विचार विनिमय करून नवीन दीपगृह बांधकाम व बसवण्याची तातडीने गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ६८,६२,४१,८९,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (३) | ५४९ | १० | विधानसभा क्षेत्रामध्ये मोहोळ तालुक्यातून जाणारी दोन राष्ट्रीय महामार्ग आहे पुणे सोलापूर व मोहोळ पंढरपूर आळंदी हे दोन महामार्ग वगळता शहरातील रस्ते व गाव खेड्याला जोडणारे रस्ते अत्यंत खराब आहेत भारत देश स्वातंत्र्य झाल्यापासून मोहोळ तालुक्यातील मनगुळी या गावाला जाण्यासाठी रस्ता सुद्धा नाही त्यामुळे मनगुळी या गावातील जनतेने रस्त्यासाठी तीन वेळा लोकसभा व विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. सबब, मोहोळ तालुक्यातील रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा व सदर रस्त्याची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्रीमती ज्योती गायकवाड** |
| (४) | २५८ | १०० | मुंबईतील सायन रेल्वेस्थानक येथील पुर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी असलेल्या ब्रिटीशकालीन ब्रिजची दुरावस्था झाल्यामुळे नवीन बांधण्यासाठी जुना ब्रिज पाडून नविन ब्रिजचे काम गेल्या पाच ते सहा महिन्यापासून सुरु करण्यात आलेले असणे, सदरहू काम महानगरपालिका व रेल्वे प्रशासनाकडून अत्यंत धिम्यागतीने सुरु असणे, सदर ब्रिजचे काम अत्यत धिम्यागतीने सुरु असल्याने वाहतूकी कोंडी वाढलेली असून शाळकरी विद्यार्थी, नागरिकांना ये-जा करण्यास गैरसोयीचे होत असणे, सदर कामासंदर्भात दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी जनआंदोलन करण्यात येऊनही अद्याप काम धिम्या गतीने सुरु असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (५) | १७३ | १०० | जोगेश्वरी पूर्व येथील जनता कॉलनी, संजय गांधी नगर येथील भुयारी मार्गाचे काम हे मागील अनेक महिन्यांपासून पूर्णपणे बंद असणे, यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संबंधित विभागाशी पाठपुरावा केला असता सदर भुयारी मार्गाच्या कामामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गाची मुंबई शहराच्या दिशेने जाणाऱ्या एका मार्गिकेचे काम शिल्लक राहिले असल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत असणे, सदर कामाकरिता मुंबई वाहतूक पोलिस विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे काम बंद असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३०/१/२०२५ रोजी मा.सह पोलिस आयुक्त (वाहतूक) तसेच संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करणे, सदर भुयारी मार्ग हा जोगेश्वरी स्टेशन रोडकडे जाणा-या रस्त्यावर असून जोगेश्वरी रेल्वे स्टेशनकडे जाणारा हा एकमेव रस्ता असणे, परिणामी या रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होणे, नागरिकांची तसेच वाहन चालकांची, शालेय विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन जोगेश्वरी–पूर्व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जनता कॉलनी येथील भुयारी मार्गाचे अपूर्ण काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (६) | ५०७ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली विधानसभा क्षेत्रातील विर्शी फाटा ते विर्शी रस्ता (प्र.जि. मा.२९) तसेच दिघोरी माठी ते खराशी रस्ता (ग्रा. मा ३५८) तसेच वडेगाव-जाभंळी-मालुटोल-सातलवाडा (प्र.जि. मा.२८ लांबी ०७ कि.मी.) तसेच जमनापुर ते सेंदुरवाफा (प्र.जि. मा.२७) रस्ता अत्यंत खराब असुन रस्ता ब-यांच ठिकाणी दबलेला व उखरलेला आहे. मागील ३ वर्षापासुन अर्थसंकल्पीय निधीतुन कोणत्याच प्रकारचे काम झालेले नाहीत. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (७) | ५३० | १०० | स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील जगदगुरु तुकाराम महाराज यांचे आजोळ श्री क्षेत्र लोहगाव-निरगुडी ता. हवेली, धानोरे ता. खेड मार्गे आळंदीला जोडणारा रस्ता महत्त्वाचा असणे, सदर मार्ग श्री क्षेत्र लोहगाव व श्री क्षेत्र आळंदी देवस्थानला जोडणारा असणे, तसेच पुणे जिल्ह्यातील हवेली व खेड या दोन औद्योगिक तालुक्यांना जोडणारा आहे, सदर रस्ता होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने मागणी करूनही या रस्त्याला निधी मिळण्यासाठी विचार केला नसणे, सबब सदर रस्ता करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५३६ | १०० | श्री क्षेत्र अष्टविनायक यापैकी एक असलेले श्री क्षेत्र थेऊरला जोडणारा खराडी - मांजरी खुर्द कोलवडी, श्री क्षेत्र थेऊर ते सोलापूर रस्त्याला जोडणारा मार्ग गेले अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, सदर रस्ता तातडीने पूर्ण होण्यासाठी सातत्याने मागणी करण्यात येणे परंतु सदर रस्त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणे, त्यामुळे लाखो नागरिकांना दूरवरच्या रस्त्याचा वापर करावा लागणे, यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणे, सबब सदर रस्ता होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (९) | ४७५ | १०० | कवठेमहंकाळ (जि. सांगली) तालुक्यातील प्रजिमा क्र.६२ या रस्त्याच्या भाग कवठेमहंकाळ ते आगळगांव व प्रतिमा ५८ या रस्त्याचा भाग आग्रण धुळगांव ते करोली (टी) या भागातील रस्ता खराब असूनही ते दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४७६ | १०० | कवठेमहंकाळ (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. १०४ या रस्ताचा बेळंकी खिंड ते कोगनोळी व कोगनोळी ते अग्रण धुळगांव भाग अत्यंत खराब असुन ही सदरचे काम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (११) | ४७७ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. ४० वरील गव्हाण गावातील पुल पावसाळयांत पाणी येवून येवून बंद पडणारी वाहतुक, त्यामुळे या पुलाचे काम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ४७८ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. ९९ वरील भाग कवठेएकंद ते राष्ट्रीय महामार्ग व कौलगे ते बलगवडे या रस्त्यांची दुरावस्थेची सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४७९ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. ६१ मधील भाग अंजनी ते तालुका हद्दि दरम्यानच्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ४८० | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. ८३ वरील भाग तासगांव ते कवठे शिरगांव व प्रजिमा क्र. ९३ वरील भाग तुरची ते वंजारवाडी तसेच प्रजिमा क्र. १४१ वरील भाग नवी डोर्ली ते कौलगे व सावर्डे ते भवानी देवी या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ४८१ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यातील प्रजिमा क्र. ३४ मधील भाग निमणी ते नागांव (नि) व प्रजिमा क्र. ९१ मधील राष्ट्रीय महामार्ग क्र. २६६ तुरची तसेच प्रजिमा क्र. १२० मधील येळावी ते तालुका हद्द या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ४८२ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र. ६१ दरम्यान वडगांव गावात अनेक वर्षांपूर्वी बांधिलेला पुल पावसाळयांत अनेकदा पाण्याखाली जाऊन रस्ता बंद पडण्याचे घडलेले प्रकार, या रस्त्या दरम्यान गावातील आरसीसी गटार बांधकाम करुन नवीन पुल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ४८३ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील प्रजिमा क्र.८३ या रस्त्यावर बेंद्री ते शिरगांव (क) दरम्यान ओढ्यावर पुल बांधण्याची आवश्यकता तसेच रामा क्र. १५५ मिळणारा प्रजिमा क्र. १०१ या रस्त्यावरील नागांव ते मतकुणकी व मणेराजुरी ते वज्रचौंडे दरम्यान रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय पोतनीस** |
| (१८) | २२८ | १०० | मुंबईतील सायन रेल्वेस्थानक येथील पुर्वेकडून पश्मिमेकडे जाण्यासाठी असलेल्या ब्रिटीशकालीन ब्रिजची दुरावस्था झाल्यामुळे नवीन बांधण्यासाठी जुना ब्रिज पाडून नविन ब्रिजचे काम गेल्या पाच ते सहा महिन्यापासून सुरु करण्यात आलेले असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सदरहू काम महानगरपालिका व रेल्वे प्रशासनाकडून अत्यंत धिम्यागतीने सुरु असणे, सदर ब्रिजचे काम अत्यंत धिम्यागतीने सुरु असल्याने वाहतूक कोंडी वाढलेली असून शाळकरी विद्यार्थी नागरिकांना ये-जा करण्यास गैरसोयीचे होत असणे, सदर कामासंदर्भात दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी जनआंदोलन करण्यात येऊनही अद्याप काम धिम्या गतीने सुरु असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | २३१ | १०० | सांताक्रुझ–चेंबुर लिंक रोड अंतर्गत सी.एस.टी. रोड हंस भ्रुग्रा रोड ते पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंतचे रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे, परंतु बांधकामाकरिता वापरण्यात आलेले साहित्य/साधन साम्रुगी रस्त्याच्या मधोमध ठेवण्यात आलेले असणे, रस्त्याच्या मधोमध साहित्य/साधन साम्रुगी ठेवण्यात आल्यामुळे वाहतुक कोंडी होत असून नागरिकांना ये-जा करण्यास अडचणीचे होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२०) | ५७४ | १० | उमरेड विधान सभा मतदार संघातील, उमरेड, भिवापूर, कुही या तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे त्या भागातील नागरिकांना व वाहन धारकांना अत्यंत जिक्रिचा सामना करावा लागत आहे त्यामुळे दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण अधिक वाढत आहे पर्यायाने नागरिक व वाहन धारकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे शासनाकडून तात्काळ १) भिवापूर - जवळी नांद - बेसूर रस्ता (रा.मा. ३४२) कि.मी. १८/०० ते ३३/०० सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. ता. भिवापूर जि. नागपूर, २) भिवापूर - जवळी नांद - बेसूर रस्ता (रा.मा. ३४२) कि.मी. ०/०० ते १७/७०० सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. ता. भिवापूर जि. नागपूर उपरोक्त रस्त्यांना प्रशासकीय मान्यता होऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५७५ | १० | उमरेड विधानसभा मतदार संघातील, उमरेड, भिवापूर, कुही या तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे त्यामुळे, त्या भागातील नागरिकांना व वाहन धारकांना अत्यंत जिक्रिचा सामना करावा लागत आहे त्यामुळे दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण अधिक वाढत आहे पर्यायाने नागरिक व वाहन धारकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे शासनाकडून तात्काळ १) चांपा, डव्हा खापरी रस्ता किमी.३३/०० ते ३९/४०० मध्ये दोन लहान पुलासह सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे, ता.उमरेड, जिल्हा नागपूर, २) सुरगाव - मांगली उटी परसोडी फुकेस्वर किमी ८/००ते २८/०० दोन लहान पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.3) परसोडी - नक्षी - भागेबोटी - कीन्हाळ! पेठरी कारगाव खैरगाव,सरांडी - पहामी - बोटेझरी खंडासरी,ते बेसुरी रस्त्याचे बांधकाम करणे (भाग सरांडी ते पाहमी)किमी.22/00 ते 26/00 तालुका भिवापूर जिल्हा नागपूर.4)राष्ट्रीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | महामार्ग 353 डी पासून गोडबोरी फाटा ते भागे बोरीसेलोटी बोर्डेकला - पाठरबाणी धायनगाव टाका ते भोसी रस्त्यांची सीमा रस्ता व पुलाचे बांधकाम करणे त्यामुळे उपरोक्त रस्त्यांना प्रशासकीय मान्यता होऊन निधीची तरतूद करण्यासाठी उपाययोजना कराव्या. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (२२) | २०८ | १०० | दर्यापूर ते आसेगाव क्रमांक २७८ महामार्ग खाल्लर ते उपराई ग्राभा क्र.२९ या मार्गे करण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. सदरचा रस्ता अंजनगाव, कापूस तळणी, कसबेगवान, साखरी खल्लार, चंद्रपूर खल्लार बस स्टॉप पूर्व दिशा, उपराई, भालशी, उदापूर वल्ली वायगाव खार तळेगाव, वडगाव या मार्गे करण्यात यावा अशी या ग्रामस्थांची मागणी असून या रस्त्यामुळे अंजनगाव मधील नागरिकांचे २० किलोमीटर पर्यंतचे अंतर व वेळ वाचणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | २८६ | १०० | उपराई तालुका दर्यापूर व भालसी तालुका भातकुली जिल्हा अमरावती या दोन्ही गावांच्या मध्यभागी पूर्णा नदी वाहत असून या नदी काठावर उपराई गावात हजारो वर्षांपूर्वीचे ऐतिहासिक असे "शाह दिलावर बाबाचा दर्गा" आहे. या दर्ग्याला राज्य शासनाचा तीर्थक्षेत्राचा 'क' वर्ग याचा दर्जा प्राप्त असून या ठिकाणी राज्यभरासह देशाच्या विविध भागातून लाखो भाविक व यात्रेकरू येत असतात. उपराई व बालसी गावाच्या मध्यभागातून पूर्णा नदी वाहत असून सदर नदीवर पुल नसल्याने या दोन्ही गावातील नागरिकांना गावांमध्ये ये-जा करण्यासाठी, तसेच दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना देखील किमान ५० ते ६० किलोमीटर अंतरावरून वळण घेऊन यावे लागते. अन्यथा बऱ्याच वेळा नागरिक आपला जीव धोक्यात घालून नदीपात्रातून ये-जा करीत असतात त्यामुळे अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पूर्णा नदीवर या दोन्ही गावांना जोडण्याकरता पुलाचे बांधकाम करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२४) | ३४० | १० | व्हरांडा-वाकडा आंबा (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) ते रेवंडी-कांबळीवाडी हा रस्ता अत्यंत खराब झाला असणे, रस्त्यावर खड्डे पडले असणे, रस्ता वाहतूकीस अयोग्य असणे, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करुन मिळण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी व कांबळीवाडी उत्कर्ष मंडळ, मुंबई यांनी मा. मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १८.३.२०१७ व २८.१२.२०१७ रोजी वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र अंसतोष, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२५) | ३४१ | १० | राणिसावरगाव ते सिरसम (पा.) व सिरसम(पा.) ते पालम, ता. पालम जि.परभणी या रस्त्यास मा.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या संशोधन व विकास कार्यक्रमातंर्गत सदरच्या रस्त्यास दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रु.३१०.६० लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान केली असणे, दिनांक.१५ मार्च, २०२४ रोजी 'ई' निविदा स्विकृतीस मान्यता दिली असणे, त्याच प्रमाणे सदरच्या रस्त्यावर (३.३ ते ०४ गाळे) लहान पुल बांधण्याचे प्रस्तावित केले असणे, तथापि सदरच्या रस्त्याचे कामे अद्याप सुरु झाले नाही संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असणे, रस्त्याचे काम अद्याप प्रगती पथावर नसणे, त्यामुळे वाहतूकीस अडचणी निर्माण होत असणे, रस्त्यावर खड्डे पडले असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये व रहिवाशांमध्ये यांच्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ३४३ | १० | तांदूळवाडी रोड सिससम फाटा ते सिरसम (ता.पालम जि.परभणी) या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असणे, एस.टी.वाहतूकीस अयोग्य झाला असणे, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, या संदर्भात स्थानिक रहिवाशांनी शासनाकडे वारंवार मागणी केली असणे, मात्र शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये व रहिवाशांमध्ये यांच्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने दखल घेऊन रस्त्याचे काम तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ३४४ | १० | मालवण (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) ते आचरा हा रस्ता अत्यंत खराब झाला असणे, रस्त्यावर खड्डे पडले असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य असणे, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करुन मिळण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी व कांबळीवाडी उत्कर्ष मंडळ, मुंबई यांनी मा. मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १८.३.२०१७ व २८.१२.२०१७ रोजी वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र अंसतोष, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १७,७७,१५,७२,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (२८) | ५६९ | १० | राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे मागील बऱ्याच वर्षांपासून सुरु असणे सदर महामार्ग कोकणातील तीन जिल्हे जोडणारा एकमेव महामार्ग असणे, आजमितीपर्यंत सदर रस्त्यावर खड्डे, पुलांची अर्धवट असलेली कामे, सर्व्हिस रोड त्याचप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा संरक्षक कुंपण, गटार लाईन आदी कामे अपूर्ण अवस्थेत असणे, शासनाच्या वतीने कंत्राटदाराला वेळोवेळी देण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आलेल्या डेडलाईन पूर्ण होणे, सदर मार्गावरील काही ठिकाणी रस्त्यावरील मातीमुळे अपघातांचे देखील प्रमाण वाढत असणे, सदर महामार्गाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडांची लागवड न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणे, या प्रकरणी शासनाकडून होत असलेली दिरंगाई, यामुळे नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोषाचे व नाराजीचे वातावरण, सबब शासनाने यावर केलेली अथवा करीत असलेली तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया . |
| (२९) | ५७३ | १० | मुंबई मध्ये रस्त्यांची दुरावस्था झालेली असणे, अनेक ठिकाणी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असणे, या खड्ड्यांमुळे वाहतुकीवर परिणाम होणे, अपघातांचे प्रमाण वाढल्याने अनेक ठिकाणी ही अपघातांचे ब्लॅक स्पॉट ठरणे, यामुळे सामान्य नागरिक त्रस्त असणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (३०) | २३० | १० | अंजनगाव सुर्जी येथील तालुका कृषी अधिकारी, तालुका बीज प्रक्षेत्र कृषी चिकित्सालय या कार्यालयाचे बांधकाम सन : २००१ मध्ये करण्यात आले होते. सद्यस्थितीत या कार्यालयाची इमारत जुनी व जीर्ण झाल्याने या कार्यालयात काम करणाऱ्या तसेच या कार्यालयात कामाकरिता येणाऱ्या शेतकरी व इतर नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज अशी नवीन इमारत उभारण्याचे तालुका कृषी अधिकारी यांनी प्रस्तावित केले असून या कामाकरिता सुमारे ५ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्याचबरोबर या कार्यालयाच्या परिसरात गट क्र.५ व १ ७ मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याकरिता सुमारे ३ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३१) | ४९४ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय एकाच ठिकाणी सुरु करून नागरिकांना सोई उपलब्ध करून देणे शासनाचे धोरण असणे, मात्र या तीनही तालुक्यातील शासकीय व निम शासकीय कार्यालय वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने नागरिकांना शासकीय काम करताना मानसिक व अर्थिक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सावली व सिंदेवाही येथे असलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे विस्तार करून त्याठिकाणी पुन्हा मजले व इतर आलेल्या मोकळ्या जागेवर शासकीय इमारत बांधण्यासाठी शासनाने निधीसह मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ४,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३२) | ३४५ | १० | मालवणी, म्हाडा लेआउट, मालाड (पश्चिम) मुंबई येथे शासनाने जागतिक बँक प्रकल्प योजनेमध्ये नियोजनात्मक तरतुदीनुसार शाळा व कनिष्ठ विद्यालय याकरिता भूखंड आरक्षित ठेवला असणे, शैक्षणिक सुविधे करिता दोन प्राथमिक शाळा व तीन संयुक्त शाळांकरिता भूखंड आरक्षित असणे, मालवणी झोपडपट्टी भागात सरकारी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय नसणे, मालवणी झोपडपट्टीत राहणारे विद्यार्थी खूप गरीब आणि गरजू असणे, त्यांना खाजगी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे शुल्क परवडत नसणे, मालवणी परिसर झोपडपट्टीत गरीब कुटुंबे राहतात त्यांच्यासाठी सरकारी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय बांधकाम करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- ७,२०,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३३) | ३३८ | १० | महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ मधील कलम २२ आणि ३७ अन्वये रुग्णांलयासाठी सी.टी.एस.३५२५ मालवणी गांव, तालुका - बोरिवली मालाड (पश्चिम) मुंबई येथील जागा सार्वजनिक आरोग्य केंद्र व प्रसूती गृहासाठी शासनाने आरक्षित असणे, परंतु त्याठिकाणी अनधिकृत रेडी मिक्स काँक्रीट प्लॉट टाकण्यात आला असणे, रेडी मिक्स काँक्रिट प्लॉटमुळ स्थानिक रहिवाशांना श्वसनाचे आजार झाले असणे, त्याचप्रमाणे दमा ब्रॉकायटिस, ह्दय रक्तवाहिन्या संबंधिचे भयंकर रोग निर्माण झाले असणे, प्रदूषण निर्माण झाले असणे, प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असणे, त्याठिकाणी सार्वजनिक रुग्णालय उभारण्यात यावे याकडे सार्वजनिक आरोग्य विभागचे संबंधित अधिका-यांनी केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ३३९ | १० | मुंबई उपनगरात मालाड (पश्चिम), भूमी पार्क, जनकल्याण नगर येथे शासनाचे सामान्य रुग्णालय असून या ठिकाणी आरोग्य सेवा संचालकांनी २०० खाटांच्या नवीन, आधुनिक व उत्तम श्रेणी दर्जेचा रुग्णालयाचा प्रस्ताव तयार केला असणे, सदर प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वर्ष २०२३ ला पाठवण्यात आला असणे, सदर रुग्णालयाच्या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे व तीन वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित असणे, आरोग्य सेवा संचालकांनी, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई यांनी शासनाला वारंवार कळविले असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीने वारंवार पत्राद्वारे कळविण्यात आले असणे, मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- ३२,३१,९६,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (३५) | ४१६ | १० | शिवडी बी.डी.डी. चाळींच्या गच्चीवर पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता उपाययोजना म्हणून शालीमार लावण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे. परंतु गेले २ ते ३ वर्षे पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता शालीमार लावण्याची प्रक्रिया केलेली नाही. त्यामुळे बी.डी.डी. चाळीतील रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागणे, शालीमार लावण्यासंदर्भात प्रस्ताव तयार केला असून निधीअभावी सदर प्रस्ताव प्रलंबित असणे, तरी शिवडी बीडीडी चाळींच्या गच्चीवर पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता शालीमार लावण्याची प्रक्रिया तातडीने करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २,०३,४४,६१,९३,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (३६) | ५५२ | १० | सांगोला तालुक्यातील कडलास हद्दीत माण नदीजवळ या इंदापूर विजापूर ९६५ जी या राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले आहे. याठिकाणी वारंवार अपघात होऊन आतापर्यंत अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. सबब सांगोला तालुक्यातील माण नदी जवळील अपूर्ण अवस्थेतील असणारे रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३७) | ४०१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातून जाणारा व्याहाड निफंद्रा गांगलवाडी ब्रम्हपूरी आरमोरी एनएच-३५३ डीला जोडणारा रस्ता प्रजिमा-२९ किमी ०/०० ते किमी ३९/५०० राज्यमार्ग क्रं.३७५ किमी ३१/८०० ते किमी ३३/९०० राज्यमार्ग क्र.३२२ किमी १८२/२०० ते किमी १८८/१०० ता ब्रम्हपूरी या रस्त्यांचे रूंदीकरणासह सुधारणा करणे व सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे या कामास हायब्रीड ॲन्युईटी हॅम योजनेतंर्गत माहे मार्च, २०२४ च्या सुमारास मंजूर करण्यात येणे, या रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्यामार्फत करण्यात येणार असणे, मात्र या रस्त्याला लागूनच अनेक जोड रस्ते |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असून ते रस्ते रहदारी करण्यास अयोग्य असल्याने हे रस्ते हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर करणे अत्यंत आवश्यक असतांना सुध्दा या रस्त्यांना अद्यापही मंजूरी मिळालेली नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातून जाणाऱ्या रस्त्यास हॅायब्रीड ॲन्यईटी अंर्तगत मंजूर करण्यात आले असल्याने या रस्त्याला लागुन असलेले जोड रस्ते तसेच सिंदेवाही ते पाथरी व पाथरी ते हिरापूर फाटा हा ४५ किमी रस्त्यांचे रूंदीकरणासह सुधारणा करणे व सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे या कामास हायब्रीड ॲन्युईटी हॅम योजनेतंर्गत निधीसह मंजूर करून त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देऊन महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांचेमार्फतीने करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ४२० | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील अनेक पूल नादुरस्त असणे, नादुरूस्त पूल रहदारीस अयोग्य असून वारंवार अपघात होत असून निरपराध लोकांचा बळी जाणे, तसेच एका गावावरून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत असून पावसाळ्यात तर अनेक गावांचा संपर्क तालुका व जिल्हा मुख्यालयाशी तुटत असल्याने नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास सहण करावा लागणे, यासाठी तिनही तालुक्यातील नागरिकांनी नदी/नाल्यावरील पुलाचे बांधकाम करण्याची मागणी करीत असतांना सुध्दा या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड जिल्हा चंद्रपूर यांनी ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील नदी/नाल्यावर पूलाचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव तयार करून या कामांना निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सचिव यांच्याकडे पाठविण्यात आले असून या प्रस्तावास तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ४२१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील अनेक रस्त्याची व पुलाची कामे कंत्राटदारांच्या माफ्रतीने सुरू असणे, या कामासाठी कंत्राटदारांनी कर्ज घेऊन व स्वत: जवळचे पैसे लावून काम करणे, करण्यात येत असलेल्या कामाचे आरए बिल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड जिल्हा चंद्रपूर यांनी मंजूर करून त्या कामाचे देयके देण्यासाठी सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे निधीची मागणी करणे, मात्र गेल्या आठ महिन्यापासून या कामाचा निधीच मिळाला नसल्याने कंत्राटदार आर्थिक संकटात सापडून गेल्या दोन महिन्यापासून काम बंद केल्याने त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्यात पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यात सुरू असलेल्या व पुर्ण झालेल्या रस्ते, पुल कामाचे देयके कंत्राटदारास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | देण्यासाठी पर्याप्त निधी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड यांना तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४०) | ४२२ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील अनेक रस्ते नादुरस्त असणे, रस्त्यावर मोठमोठ खड्डे पडलेले असल्याने रहदारीस अयोग्य असून वारंवार अपघात होत असून निरपराध लोकांचा बळी जाणे, त्यामुळे सिंदेवाही तालुक्यातील नागरिकांनी नादुरूस्त असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने करण्याची मागणी करण्यात आलेली असतांना सुध्दा याकामास अघापही मंजूरी मिळत नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तिव्र असंतोश व संतापाचे वातावरण परिणामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड जिल्हा चंद्रपूर यांनी सिंदेवाही तालुक्यातील ओडीआर, एमडीआर, व्हिआर रस्त्याचे प्रस्ताव तयार करून या कामाना निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सचिव रस्ते यांच्याकडे पाठविण्यात आले असून या प्रस्तावास तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | ४२३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील अनेक रस्ते नादुरस्त असणे, रस्त्यावर मोठमोठ खड्डे पडलेले असल्याने रहदारीस अयोग्य असून वारंवार अपघात होत असून निरपराध लोकांचा बळी जाणे, त्यामुळे सावली तालुक्यातील नागरिकांनी नादुरूस्त असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने करण्याची मागणी करण्यात आलेली असतांना सुध्दा याकामास अद्यापही मंजूरी मिळत नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड जिल्हा चंद्रपूर यांनी सावली तालुक्यातील ओडीआर, एमडीआर, व्हिआर रस्त्याचे प्रस्ताव तयार करून या कामाना निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सचिव रस्ते यांच्याकडे पाठविण्यात आले असून या प्रस्तावास तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४२) | ४२५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्यातील अनेक रस्ते नादुरस्त असणे, रस्त्यावर मोठमोठ खड्डे पडलेले असल्याने रहदारीस अयोग्य असून वारंवार अपघात होत असून निरपराध लोकांचा बळी जाणे, त्यामुळे ब्रम्हपूरी तालुक्यातील नागरिकांनी नादुरूस्त असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने करण्याची मागणी करण्यात आलेली असतांना सुध्दा याकामास अद्यापही मंजूरी मिळत नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड जिल्हा चंद्रपूर यांनी ब्रम्हपूरी तालुक्यातील ओडीआर, एमडीआर, व्हिआर रस्त्याचे प्रस्ताव तयार करून या कामाना निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सचिव रस्ते यांच्याकडे पाठविण्यात आले असून या प्रस्तावास तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २८,५२,०६,९३,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४३) | ४८५ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील सावली हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह नसणे, त्यामुळे व्हीआयपी तसेच शासकीय कामकाजसाठी येणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सावली मुक्कामी राहतो म्हटल्यास मोठी गैरसोय निर्माण होणे, या कारणास्तव सावली येथे शासकीय विश्राम गृहाचे बांधकाम करण्याची मागणी करून सुद्धा अद्यापही विश्रागृहास परवानगी मिळालेली नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे नवीन शासकीय व्ही आय पी विश्रामगृह मंजूर करून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्यासाठी शासनाने तातडीने कारवायाची कार्यवाही. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई